सं.फौ.खटला क्र.५७४/२०२१
सरकार वि. महेश वगैरे ४
नि.क्र.३४ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :-**

नाव : संजय राजुजी वाघमारे
वय : २८ वर्ष, कामधंदा : चालक,
राहणार : चाचेर, तालुका मौदा, जिल्हा नागपूर.

**सरतपास श्रीमती एम.एम.राऊत सहाय्यक सरकारी वकिलामार्फत** :-

१. मी फिर्यादी व आरोपीला ओळखत नाही. दि.०४.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला मनसर चौक येथील आरटीओ चेक पोस्ट जवळ पंच म्हणून बोलविले नव्हते. मी ॲम्बुलेंस घेऊन त्याठिकाणाहून चाललो होतो त्यावेळी माझी पोलीसांनी पंचनाम्यावर सही घेतली. पंचनाम्यामध्ये काय लिहीले होते याची मला माहीती नाही. माझ्यासमक्ष काही जप्त केले नव्हते. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही अनुक्रमांक १ वर आहे. त्यातील मजकूराविषयी मला माहीती नाही. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.३८** देण्यात येतो.

साक्षीदार अभियोग पक्षाला सहयोग करीत नसल्यामुळे उलट तपासाची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.

**उलट तपास अभियोग पक्षातर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला मनसर नाक्यावर जवळपास ०८.०० वाजता पंच म्हणून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत फिर्यादी, पोलीस स्टाफ व दुसरा पंच आकाश मोहनकर हा हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी हे येणा-या जाणा-या गाडयांना थांबवून त्यांचेकडून पैसे वसुल करतांना मिळून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी पाचही आरोपींना ताब्यात घेतले व त्यांच्यापैकी महेश खंडाते याचेकडून नगदी रु.१५२०/- व सॅमसंग कंपनीचा

सिलव्हर रंगाचा मोबाईल, गणेश मडावी याचेकडून रु.२०१०/– व विवो कंपनीचा मोबाईल, मोहन खंडाते याचेकडून रु.१२,५००/– व विवो कंपनीचा मोबाईल, किशोर वरखडे याच्या कडून रु.३९००/– व रिअलमी कंपनीचा मोबाईल, अब्दुल नईम याचेकडून नगदी रु.९२/– व एमआय कंपनीचा मोबाईल असे जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर त्याबाबतचा सविस्तर पंचनामा पोलीसांनी माझेसमक्ष तयार केला व त्यावर आरोपी व आम्हा दोघे पंचाच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपींचे वकिल श्री ए.जी.कारेमोरे यांनी नाकारला.**

फेरतपास – नाही.

श्रवणौत्तर स्वीकृत

माझे समक्ष

(एच.एस.सातपुते)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक

रामटेक.
दिनांक : ३०.०८.२०२२.